# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महाल, सि.पी. अँड बेरार कॉलेज समोर मौजा-नागपूर
**{महसूल विभाग}** सीटी सर्व्हे क्र. २९४, शिट क्र. २५६ येथे अत्याधुनिक व आरोग्य वर्धक विपणन केंद्र राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड, हैद्राबाद (एन.एफ.डी.बी.) यांचे अनुदान व म.न.पा.चे अनुदान असे मिळुन म.न.पा. सभागृह ठराव क्र. २८४ दि. ३०.११.२०११ अन्वये ठोक व घावुक विपणन केंद्र बांधण्यात आले. सदरहु मार्केट मध्ये २० ओटे तळमजला (आकार २.२१ चौ.मी. X २.१० चौ.मी.) व १० ओटे प्रथम मजला (आकार ४.५३ चौ.मी. X २.१० चौ.मी.) बांधण्यात आलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३२ (क) च्या तरतुदिन्वये स्थायी समिती म.न.पा. ठराव क्र. २८३ दि. २८.११.२०१४ अन्वये मान्यता प्रदान करून मंगळवारी मार्केट येथे ओटयांचे आवंटन केल्याप्रमाणे अत्याधुनिक व आरोग्य वर्धक विपणन केंद्र महाल, नागपूर सोबत जोडलेल्या सर्वेक्षण यादीतील १९ मासोळी व ८ मटन विक्रेत्यांना ओट्याचे येणारे बाजार मुल्य न आकारता, बाजार दराप्रमाणे फक्त मासीक ओटा भाडे आकारून सदरहु ओटे अकरा महिन्याच्या कालावधीकरीता देणेचे व बाजाराची सुस्थिती व साफसफाई करीता स्वतंत्र निविदा प्रशासनाला काढणेचे मा. आयुक्त तथा प्रशासक हयांनी सुचविले आहे. सदरहु ठरावाची अंमलबजावणी होणे हेतु संबंधीत विक्रेते यांना ओटे ईश्वर चिट्ठी काढुन आवंटन करणेची प्रक्रिया राबविण्याचे बाजार विभागाव्दारे प्रस्तावित आहे.

मनपा टाऊन हॉलच्या मागे विक्री करणाऱ्या मासोळी व मास विक्रेत्यांचा तिनदा बाजार विभागाव्दारे सर्वे करण्यात आला. त्या अनुषंगाने तेथिल व्यवसाय करणाऱ्या व्यवसायकांची अंतिम यादी सादर करण्यात आली व सदर्हु यादी धारीकेच्या उजव्या बाजुस पृष्ठ क्र. T-८५ व ८६ वर टाचण आहे.

सदरहु यादीतील १९ मासोळी व ८ मटन विक्रेत्यांना अत्याधुनिक व आरोग्य वर्धक विपणन केंद्र महाल, मौजा-नागपूर येथे बांधण्यात आलेल्या घाऊक विपणन केंद्र येथील ३० ओटे देणे बाबत प्रश्न विचारात घ्यावयाचा आहे. तसेच शिल्लक ओटयांचे आवंटन करीता अर्ज मागवुन प्रथम येणार प्रथम घेणार तत्वावर संबंधित मासोळी विक्रेत्याकडुन प्राप्त अर्ज स्थायी समिती समोर ठेवुन मान्यता घेवुन शिल्लक ओटे आवंटीत करण्याचा प्रश्न विचारात घेणे. तसेच RFP प्रक्रिया राबवून उक्त मासोळी मार्केट चे व्यवस्थापन व देखभाल खाजगी एजेन्सी कडुन करून घेणेचा प्रश्न विचारात घेणे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) अन्वये महानगरपालिकेच्या मालकीचा जागेचा विनियोग होणे अभिप्रेत आहे. व त्यानुसार संबंधीत बाजारातील ओटयांचे बाजार मुल्य रु. ३,४१,५७८/ प्रती ओटा (तळमजला) ४.६४१ चौमी. क्षेत्रफळाकरीता व भाडे रु. १,३४४/- मासीक, ओट्याचे बाजार मुल्य रू. ७,१५,७००/ प्रती ओटा (प्रथममजला) ९.५१३ चौ.मी. क्षेत्रफळाकरीता व भाडे रू. २,५५४/- मासीक दराने वसुल होणे अपेक्षीत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) नुसार येणारे बाजार मुल्य आकारून सदरहु बाजारातील ओट्याचे आवंटन करणे उचित नाही, कारण एवढे बाजार मुल्य मासोळी विक्रेते जमा करू शकणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३२ (अ) अन्वये महानगरपालिका बाजारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा यांचा भोगवटा व वापर करण्याबद्दल स्थायी समितीच्या मान्यतेने वेळोवेळी ठरविल असे दुकान भाडे, भाडे व फी आकारणेची तरतुद आहे. तसेच कलम ३३२ (ब) अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेने उपरोक्त प्रमाणे योग्य असलेले दुकान भाडे, भाडे आणि फी किंवा त्यांचा कोणताही भाग एका वेळी एका वर्षाकरीता अधिक होणार नाही अशा कोणत्याही कालावधीकरीता

मक्त्याने देण्याची तरतुद आहे व कलम ३३२ (क) अन्वये अशी सुध्दा तरतुद आहे की, महानगरपालिकेच्या बाजारातील दुकानाचे, गाळ्याचे, जागेचे आवंटन हे जाहीर लिलावाने किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगी रित्या विक्रीकरून विनियोग करणे अपेक्षित आहे.

उपरोक्त अधिकारान्वये अत्याधुनिक व आरोग्य वर्धक विपणन केंद्र महाल, नागपूर मासोळी मार्केट येथील ३० ओटे यांचे आवंटन सोबत जोडलेल्या यादीतील मासोळी व मांस विक्रेत्यांना ओट्याचे येणारे बाजार मुल्य न आकारता बाजार दराप्रमाणे ४.६४ चौ.मी. च्या क्षेत्रफळाच्या ओटयाकरीता मासिक भाडे रू. १,३४४/- तथा ९.५१३ चौ.मी. च्या ओटयाकरीता मासिक भाडे रू. २,७५४/- दराने ठराव क्र. ३११ अन्वये शिघ्रसिध्द गणकाच्या ५०% दराने आकारणी करून ११ महिन्याच्या कालावधी करीता परवान्यावर आवंटीत करणेचा प्रश्न विचारात घेणे संबंधित माहिती धारीकेत संलग्न आहे.

**टिप**

१. सविस्तर टिपणी नस्तीत सलग्न.
२. स्थायी समिती, म.न.पा. ठराव क्र. २८३ दि. २८.११.२०१४ ची प्रत पृष्ठ क्र. ८२ वर
३. स्थायी समिती, म.न.पा. ठराव क्र. २८४ दि. ३०.११.२०११ ची प्रत पृष्ठ क्र. ७९ वर
४. १९ मासोळी व ८ मटन विक्रेत्यांची यादी नस्तीत संलग्न.

# <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 1323/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 28/03/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, महसूल विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाल, सि.पी. अँड बेरार कॉलेज समोर मौजा-नागपूर सीटी सर्व्हे क्र. २९४, शिट क्र. २५६ येथे अत्याधुनिक व आरोग्य वर्धक विपणन केंद्र राष्ट्रीय मत्स्यकी विकास बोर्ड, हैद्राबाद (एन.एफ.डी.बी.) यांचे अनुदान व म.न.पा.चे अनुदान असे मिळुन म.न.पा. सभागृह ठराव क्र. २८४ दि. ३०.११.२०११ अन्वये ठोक व घावुक विपणन केंद्र बांधण्यात आले. सदरहु मार्केट मध्ये २० ओटे तळमजला (आकार २.२१ चौ.मी. X २.१० चौ.मी.) व १० ओटे प्रथम मजला (आकार ४.५३ चौ.मी. X २.१० चौ.मी.) बांधण्यात आलेले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३२ (क) च्या तरतुदिन्वये स्थायी समिती म.न.पा. ठराव क्र. २८३ दि. २८.११.२०१४ अन्वये मान्यता प्रदान करून मंगळवारी मार्केट येथे ओटयांचे आवंटन केल्याप्रमाणे अत्याधुनिक व आरोग्य वर्धक विपणन केंद्र महाल, नागपूर सोबत जोडलेल्या सर्वेक्षण यादीतील १९ मासोळी व ८ मटन विक्रेत्यांना ओट्याचे येणारे बाजार मुल्य न आकारता, बाजार दराप्रमाणे फक्त मासीक ओटा भाडे आकारून सदरहु ओटे अकरा महिन्याच्या कालावधीकरीता देणेचे व बाजाराची सुस्थिती व साफसफाई करीता स्वतंत्र निविदा प्रशासनाला काढणेचे मा. आयुक्त तथा प्रशासक हयांनी सुचविले आहे. सदरहु ठरावाची अंमलबजावणी होणे हेतु संबंधीत विक्रेते यांना ओटे ईश्वर चिठ्ठी काढुन आवंटन करणेची प्रक्रिया राबविण्याचे बाजार विभागाव्दारे प्रस्तावित आहे.

मनपा टाऊन हॉलच्या मागे विक्री करणाऱ्या मासोळी व मास विक्रेत्यांचा तिनदा बाजार विभागाव्दारे सर्वे करण्यात आला. त्या अनुषंगाने तेथिल व्यवसाय करणाऱ्या व्यवसायकांची अंतिम यादी सादर करण्यात आली व सदर्हु यादी धारीकेच्या उजव्या बाजुस पृष्ठ क्र. T-८५ व ८६ वर टाचण आहे.

सदरहु यादीतील १९ मासोळी व ८ मटन विक्रेत्यांना अत्याधुनिक व आरोग्य वर्धक विपणन केंद्र  महाल, मौजा-नागपूर येथे बांधण्यात आलेल्या घाऊक विपणन केंद्र येथील ३० ओटे देणे बाबत प्रश्न विचारात घ्यावयाचा आहे. तसेच शिल्लक ओटयांचे आवंटन करीता अर्ज मागवुन प्रथम येणार प्रथम घेणार तत्वावर संबंधित मासोळी विक्रेत्याकडुन प्राप्त अर्ज स्थायी समिती समोर ठेवुन मान्यता घेवुन शिल्लक ओटे आवंटीत करण्याचा प्रश्न विचारात घेणे. तसेच RFP प्रक्रिया राबवून उक्त मासोळी मार्केट चे व्यवस्थापन व देखभाल खाजगी एजेन्सी कडुन करून घेणेचा प्रश्न विचारात घेऊन,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) अन्वये महानगरपालिकेच्या मालकीचा जागेचा विनियोग होणे अभिप्रेत आहे. व त्यानुसार संबंधीत बाजारातील ओटयांचे बाजार मुल्य रु. ३,४१,५७८/ प्रती ओटा (तळमजला) ४.६४१ चौमी. क्षेत्रफळाकरीता व भाडे रु. १,३४४/- मासीक, ओट्याचे बाजार मुल्य रू. ७,१५,७००/ प्रती ओटा (प्रथममजला) ९.५१३ चौ.मी. क्षेत्रफळाकरीता व भाडे रू. २,५५४/- मासीक दराने वसुल होणे अपेक्षीत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) नुसार येणारे बाजार मुल्य आकारून सदरहु बाजारातील ओट्याचे आवंटन करणे उचित नाही, कारण एवढे बाजार मुल्य मासोळी विक्रेते जमा करू शकणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३२ (अ) अन्वये महानगरपालिका बाजारातील कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा यांचा भोगवटा व वापर करण्याबद्दल स्थायी समितीच्या मान्यतेने वेळोवेळी ठरविल असे दुकान भाडे, भाडे व फी आकारणेची तरतुद आहे. तसेच कलम ३३२ (ब) अन्वये स्थायी समितीच्या मान्यतेने उपरोक्त प्रमाणे योग्य असलेले दुकान भाडे, भाडे आणि फी किंवा त्यांचा कोणताही भाग एका वेळी एका वर्षाकरीता अधिक होणार नाही अशा कोणत्याही कालावधीकरीता मक्त्याने देण्याची तरतुद आहे व कलम ३३२ (क) अन्वये अशी सुध्दा तरतुद आहे की, महानगरपालिकेच्या बाजारातील दुकानाचे, गाळ्याचे, जागेचे आवंटन हे जाहीर लिलावाने किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने अशा विशेषाधिकाराचा खाजगी रित्या विक्रीकरून विनियोग करणे अपेक्षित आहे.

उपरोक्त अधिकारान्वये अत्याधुनिक व आरोग्य वर्धक विपणन केंद्र महाल, नागपूर मासोळी मार्केट येथील ३० ओटे यांचे आवंटन सोबत जोडलेल्या यादीतील मासोळी व मांस विक्रेत्यांना ओट् याचे येणारे बाजार मुल्य न आकारता बाजार दराप्रमाणे ४.६४ चौ.मी. च्या क्षेत्रफळाच्या ओटयाकरीता मासिक भाडे रू. १,३४४/- तथा ९.५१३ चौ.मी. च्या ओटयाकरीता मासिक भाडे रू. २,७५४/- दराने ठराव क्र. ३११ अन्वये शिघ्रसिध्द गणकाच्या ५०% दराने आकारणी करून ११ महिन्याच्या कालावधी करीता परवान्यावर आवंटीत करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.